# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- १८/११/२०१८

### सिन्नर शहरातील भरवस्तीत घरफोडया करणारे सराईत गुन्हेगार स्थागुशाचे जाळयात

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी जिल्हयातील नाउघड घरफोडीचे गुन्हयांचा सविस्तर आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी सर्व पोलीस ठाणे तसेच स्थागुशाचे पथकास सराईत गुन्हेगारांचा मागमुस काढुन सतर्क रात्रगस्त करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी घरफोडीचे रेकॉर्डवरील गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दत व चोरून नेलेले मुद्देमाल कोठे विक्री केला जातो याबाबत गोपनीयरित्या माहिती घेवुन स्थागुशाचे पथकास गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या.

दिनांक १७ नोव्हेंबर २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा शोध घेत होते, दरम्यान स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना खब-यांमार्फत मिळालेल्या गुप्त बातमीनुसार सिन्नर व नाशिक शहरात घरफोडया करणारे संशयीत गुन्हेगार उद्योगभवन, सिन्नर परिसरात आले असल्याचे खात्रीशीररित्या समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने सिन्नर शहरातील उद्योगभवन परिसरात साई मंदिराजवळ सापळा रचुन घरफोडया करणारे सराईत गुन्हेगार नामे **१) प्रशांत शांतिलाल वाघ, वय २७,** रा. साईदर्शन अपार्टमेंट, उद्योगभवन सिन्नर, ता.सिन्नर, **२) राहुल दिलीप धोत्रे, वय २०,** रा.आडवा फाट, इदगाहजवळ, सिन्नर, ता.सिन्नर यांना शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीतांना विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्यांनी माहे सप्टेंबर महिन्यात सिन्नर शहरातील व्दारका नगरी परिसरातील बंद घरांचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरफोडया केल्या असल्याची कबुली दिली आहे. सदर घटनेबाबत **सिन्नर पोलीस ठाणेस** दाखल असलेला गुन्हा रजि.नं. **१५३/२०१८ भादविक ४५७,३८०** हा गुन्हा उघडकीस आलेला असुन सदर आरोपीतांचे कब्जातुन गुन्हयात चोरून नेलेले **०२ गॅस सिलेंडर, ०१ कोडॅक कंपनीचा कॅमेरा, ०२ एल.ई.डी.टी.व्ही., मोबाईल फोन** व गुन्हयात वापरलेली **बजाज डिस्कव्हर** मोटर सायकल असा **एकुण ५७ हजार ५०० रू. किं.चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे.

ताब्यात घेतलेले वरील दोन्ही आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांनी सिन्नर शहर तसेच नाशिकरोड व सातपुर परिसरातही बंद घरांवर पाळत ठेवुन घरफोडया केल्याची कबुली दिली आहे. वरील गुन्हयांचे समांतर तपासात सदर आरोपीतांकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे सो** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** पोहवा रविंद्र वानखेडे, प्रकाश चव्हाणके, दिलीप घुले, पोना प्रितम लोखंडे, किरण काकड, पोकॉ निलेश कातकाडे, संदिप लगड, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, चालक भुषण रानडे यांचे पथकाने वरील आरोपीतांना ताब्यात घेवुन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहे.